## जिल्हा व सत्र न्यायालय, चंद्रपूर.

## "कनिष्ठ लिपीक" व "शिपाई" पदाचे प्रतिक्षा यादीवरील उमेदवारांना सुचना

### सुचना

मा. उच्च न्यायालय, मुंबई, खंडपीठ नागपूर यांचे पत्र कमांक एन–४०/१५–५/६१ (आर), दिनांक ८ जानेवारी, २०१९ मधील निर्देशाचे अनुषंगाने मा. उच्च न्यायालय, नागपूर यांचे आस्थापनेवर लिपीकाचे–४५ पदे व शिपाई पदाचे–२६ पदे रिक्त असून ती पदे भरावयाची आहेत. सदरची रिक्त असलेली पदे विदर्भ विभागातील जिल्हा न्यायालयाचे आस्थापनेवरील कनिष्ठ लिपीक व शिपाई या पदाच्या निवड/प्रतिक्षा यादीवर उपलब्ध असलेल्या व जे उमेदवार मा. उच्च न्यायालय, खंडपीठ नागपूर येथे कर्तव्य करण्यास इच्छुक उमेदवारांमधून भरावयाची असल्याबाबत संदर्भांकित पत्रान्वये कळविण्यात आलेले असुन, त्याबाबतची माहिती मागविण्यात आलेली आहे.

त्या अनुषंगाने, मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, चंद्रपूर यांचे आदेशानुसार, जिल्हा न्यायालय, चंद्रपूरचे आस्थापनेवरील सेवाप्रवेश भरती प्रकिया–२०१८ अन्वये "कनिष्ठ लिपीक" व "शिपाई" या पदाच्या निवड/प्रतिक्षा यादीवरील उपलब्ध असलेल्या इच्छुक उमेदवारांना याव्दारे कळविण्यात येते की, जे उमेदवार मा. उच्च न्यायालय, मुंबई, खंडपीठ नागपूर यांच्या आस्थापनेवर कर्तव्य करण्यास इच्छुक असल्यास त्यांनी त्याबाबतचे लेखी संमतीपत्र जिल्हा न्यायालय, चंद्रपूर येथे दिनांक २८/०१/२०१९ पर्यंत सादर करावे.

त्यानंतर आलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

दिनांक :– १७ जानेवारी, २०१९.

आदेशान्वये,

(स्वाक्षरी) १७/१/१९

(रा. मा. नागमोते)
प्रबंधक,
जिल्हा न्यायालय, चंद्रपूर.